# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक – 02.05.2023** **वार – गुरुवार**

---

**मतदार सहाय्यता कक्ष**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार यादीत मतदारांचे नाव आणि मतदान केंद्र शोधण्यासाठी पुणे जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघात मतदार सहाय्यता कक्षाची स्थापना करण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिली. यासाठी प्रत्येक मतदारसंघ क्षेत्रात स्वतंत्र कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतदारांना माहितीसाठी त्यांच्या भ्रमणध्वनीवर संपर्क साधता येणार आहे.

**राहुल गांधी**

पुणे लोकसभा मतदार संघातले महविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्या प्रचारार्थ काँग्रेसचे नेते राहुल गांधी उद्या पुण्यात येत आहेत. एस एस पी एम एस महाविद्यालयाच्या मैदानावर दुपारी त्यांची सभा होणार आहे.

**वंदना चव्हाण**

देशातली लोकशाही आणि संविधान सुरक्षित ठेवायचे असेल तर केंद्रातील नरेंद्र मोदी सरकार सत्तेतून खाली खेचणे गरजेचे आहे अशी टीका राज्यसभेच्या माजी खासदार ॲड. वंदना चव्हाण यांनी आज पुण्यात केली. रविंद्र धंगेकर यांच्या प्रचारार्थ आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या.

**मोहोळ**

पुणे लोकसभा मतदार संघातील भाजपाचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी आज सकाळी सहकार नगर, धनकवडी, कात्रज भागात प्रचारफेरी काढली होती. आमदार माधुरी मिसाळ, माजी उपमहापौर सरस्वती शेंडगे यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते त्यामध्ये सहभागी झाले होते. यावेळी मोहोळ यांनी नागरिकांशी चर्चा करून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

**लोकसेना पार्टी**

शिरूर लोकसभा मतदारसंघातील लोकसेना पार्टीचे अधिकृत उमेदवार, तसंच ओबीसी बहुजन पार्टीचे पुरस्कृत उमेदवार असलम इसाक बागवान यांनी आज कोंढवा, हडपसर भागात प्रचाराचा प्रारंभ केला. त्यांनी सुखसागरनगर, हडपसर परिसरातल्या मतदारांशी संवाद साधला.

**गृहमतदान**

85 वर्षांपेक्षा जास्त वय असलेले मतदार आणि दिव्यांग मतदारांना घरून मतदान करण्याची सुविधा निवडणूक आयोगानं उपलब्ध करून दिली आहे. बारामती मतदारसंघात गृह मतदानाची ही प्रक्रिया सुरु झाली असून आज खुटवड गाव इथल्या 89 वर्षाच्या वयोवृद्ध महिला मतदारानं प्रथमच घरून मतदान केला.

**पोवाडा गायन**

मतदार जागृती अभियाना अंतर्गत, शाहीर हिंगे लोककला प्रबोधिनी आणि प्रबोधन मंच पुणे यांच्या वतीनं आज पुण्यात संभाजी उद्यानासमोर शाहिरी पोवाडा गायन करण्यात आले. लोकसभा निवडणुकीसाठी शंभर टक्के मतदान करण्याचा आग्रह करणारा पोवाडा यावेळी शाहीर आचार्य हेमंतराजे मावळे आणि 50 सहकाऱ्यांनी गायला.

**<u>जनजागृती</u>**

चिंचवड विधानसभा मतदारसंघामध्ये, मतदार जनजागृती उपक्रमात अंध दिव्यांग नागरिकांना ब्रेल लिपीत मतदार चिठ्ठीचे वाटप करण्यात आलं; तसंच मतदानाचे कर्तव्य बजाविण्याकरिता प्रोत्साहित करण्यात आले.

**<u>वाहतूक</u>**

जुन्या मुंबई पुणे महामार्गावरील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्गावर आता दुहेरी वाहतूक सुरू झाली आहे. मागील तीन वर्षापासून सुरू असलेले मेट्रोचे काम तसेच रस्ता रुंदीकरणामुळे हा मार्ग एकेरी करावा लागला होता. यामुळे खडकी मुख्य बाजार इथं अडचण निर्माण होत होती. पुणे शहर वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त रोहिदास पवार यांनी याबाबतचे आदेश काढले आहेत.

**<u>कारवाई</u>**

पुणे महापालिकेच्या अतिक्रमण विभागानं बेवारस वाहनांवर कारवाईची मोहीम हाती घेतली आहे. ही वाहनं सोडवण्यासाठी गाडी मालकाला 5 हजार पासून ते 25 हजार पर्यंत दंड होऊ शकणार आहे. यासंदर्भात अतिक्रमण विभागानं 700 वाहनांना नोटिसा पाठवल्या आहेत.

**<u>कर्करोग निदान ओपीडी</u>**

कर्करोगाचं वेळीच निदान झाल्यास, त्यावर प्रभावी उपचारांनी मात करता येऊ शकते. या उद्देशानं तळेगाव मधल्या टीबीएच ऑन्को लाईफ कॅन्सर सेंटरच्या वतीनं येत्या 31 मेपर्यंत मोफत बाह्य रुग्ण विभाग सुरू करण्यात आला असल्याची माहिती रूग्णालय प्रशासनानं दिली.

**<u>रेल्वे</u>**

पुणे रेल्वे विभागात एप्रिल महिन्यात विना तिकीट प्रवास करणाऱ्या 35 हजार 129 प्रवाशांकडून 3 कोटी 12 लाख रुपये दंड वसूल करण्यात आला. तर 14 हजार 463 प्रवाशांना अनियमित प्रवासासाठी 93 लाख 90 हजार रुपये दंड ठोठावण्यात आला असल्याची माहिती मध्य रेल्वेने दिली.

**<u>यशस्वी यशोगाथा प्रकाशन</u>**

शिका आणि कमवा योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीतून यशस्वी संस्थेनं आत्मनिर्भर युवा पिढी घडवण्याचं केलेलं कार्य कौतुकास्पद आहे, असं मत प्रसिद्ध गीतकार, चित्रपट दिग्दर्शक श्रीरंग गोडबोले यांनी व्यक्त केलं. ते काल पुण्यात 'यशस्वी' संस्थेच्या 'यशोगाथा' विशेषांकाचे प्रकाशन करताना बोलत होते.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 40 अंश तर किमान तापमान 18 पूर्णांक 7 दशांश अंश नोंदवलं गेलं. उद्याही तापमानात फारसा बदल संभवत नसल्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**